नेत्र शिबीर

www.nagarsahyadri.com

संपादक – शिवाजी शिर्के

# नगर सह्याद्री

माऊली
ट्रेडिंग कंपनी
बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स टाइल्स, ग्रॅनाइट, सॅनिटरी वेअर, प्लंबिंग
४० प्रकारचे ग्रॅनाइट उपलब्ध
नगर–पुणे रोड, सुपा, प्लॉट क. १६/९, गेस्ट हाऊस समोर, सुपा, ता. पारनेर, जि. अहमदनगर–४१४३०१ maulitrading99@gmail.com
सुखदेव पवार ९८५००२८७३० / सागर फलके ७७५६८४९४७९ / संदिप लोहाडे ९९६०२२७३००

अहिल्यानगर । वर्ष १२ । अंक १०२, शुक्रवार, दि. २१ फेब्रुवारी २०२५ । किंमत – ३ रुपये (पाने ४) ■ ANR/055/2021-2023 । RNI No. MAHMAR/2013/59865 ■ nagarsahyadri@gmail.com

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक,
शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196



### राजे, आमच्या दावणीचा मालक बदललाय हो! राजे, हा मालक शोधा! राजे, होय तुम्हीच शोधा!

# राजे, आम्हाला (जमलं तर) माफ करा!

## गँगस्टरचे पोस्टर्स अन् कानठळ्या बसविणारा डीजे । राजे, मोक्कार दारु ढोसून नाचलो हो आम्ही

**राजे जयंतीच्या निमित्ताने आम्ही ऊर बडवला तुमच्या नावानं! तुमच्या धाडसाचं कौतुक करणारे पोवाडे जसे वाजवले तसेच आम्ही वाजवले ते कानफाटेस्तोवर डीजेची गाणी! आयाबहिणींचा सन्मान करणारे, त्यांची ओटी भरवून त्यांची सन्मानाने पाठवणी करणारे तुम्हीच! आम्ही त्यांच्याच समोर हिडीस गाणे लावत डीजेच्या तालावर मरेस्तोवर दारु ढोसली अन् चक्कर येऊन पडेस्तोवर नाचलो! राजे, झिंगाट झालो हो आम्ही! काय करणार! आमच्या साहेबांना, दादांना, भाईला नगरसेवक पदाचे वेध लागलेत! हिंदू हिताचा नेता नक्की कोण हे दाखविण्याची स्पर्धा आमच्या नगरमध्ये सुरू झालीय! हिंदू हित की बात कोण करतेय आणि कोण हिंदूंचा कैवार घेतोय या स्पर्धेत कालच्या तुमच्या जयंतीच्या मिरवणुकीत आम्हाला दारु पिण्यास मोक्कार मोकळीक दिली होती हो. काय करणार! तुमच्या जयंतीच्या निमित्ताने शासनाने दारु दुकाने बंद ठेवली होती. परमीट रुम बंद ठेवले होते. पण, राजे आम्हाला ती अवदसा नुसती भेटलीच नाही तर जीव जावोस्तोवर ढोसायला भेटली! राजे लई झिंगलो हो आम्ही तुमच्या मिरवणुकीत! राजे, तुम्हाला रयतेचं राज्य अभिप्रेत होतं आणि तुम्ही त्यासाठी प्राणपणाने लढा दिला! राजे आम्ही तुमच्या मिरवणुकीत बिष्णोईचे फोटो घेऊन नाचलो. राजे, आम्हाला आज समजलं की तो बिष्णोई गँगस्टर आहे! राजे, आज आमच्यातील काहींचे कान सुन्न झालेत! लई आव्वाज होता हो काल त्या डिजेचा! राजे, तुमचे कान शाबूत आहेत ना! राजे, जरा चुकलंच आमचं! आम्हाला माफ करा इतकंच!**



सारिपाट

शिवाजी शिर्के, संपादक
९४२२२२१७६१

राजे, तुमच्या जयंतीच्या निमित्ताने आमच्या नगर शहरातून बुधवारी काढण्यात आलेल्या शिवजयंती मिरवणुकीत एका संघटनेच्या कार्यकर्त्यांनी राजकीय नेत्यांसह चक्क कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा फलक झळकावला. याच फलकावर पाठीमागील बाजूस भाजप नेते, मंत्री नितेश राणेंचाही फोटो होता. डीजेच्या तालावर नाचताना कार्यकर्त्यांनी स्वातंत्रवीर सावरकर, नथुराम गोडसे यांच्यासह मंत्री नितेश राणे व कुख्यात गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा फोटो असलेले पोस्टर्स झळकावले. बिश्नोईच्या फलकावर 'आय ॲम ए हिंदू ए मॅड ए मॅड' असे लिहिले होते. राजे, आज सकाळी आम्ही भानावर आलो अन् आमच्या हातून जरा चूकच झाली असं आम्हाला वाटू लागलंय! राजे आम्हाला माफ करा!

पाटोद्याचे मित्रवर्य कवी सुर्यकांत डोळसे यांची आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारी कविता आज आमच्या वाचन्यात आली आणि आमचे डोळे खाडकन उघडले. राजे, सुर्यकात डोळसे म्हणतो, राजे खरं सांगू, तुमच्या कल्पनेतलं रयतेचं राज्य दूर दूर कुठं दिसत नाही कारण आराध्य दैवत सतत मनात, डोक्यात व आचरणात ठेवुन मिरविणे गरजेचे असताना केवळ डोक्यावर घेवुन नाचणारेच जास्त झाली आहेत. राजे, चला तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो.... राजे असा कंटाळा करून चालणार नाही,माझ्याशिवाय तुमच्याशी, खरे कुणीच बोलणार नाही. राजे, चला तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो. शिवबा घडवायचा असेल तर त्यासाठी जिजाऊ असली पाहिजे. शहाजीच्या मनामध्ये ही आस ठसली पाहिजे. पण आजकाल हे सारे घडताना दिसत नाही, ▶ पान २ वर

### कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंना

# दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा

मुंबई । नगर सह्याद्री

राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर आली आहे. महायुती सरकारमधील कृषीमंत्री आणि अजित पवार गटाचे आमदार माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. नाशिक जिल्हा न्यायालयाने माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकोटे यांना दोन वर्षांचा कारावास आणि ५० हजारांचा दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९९५ साली कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप होती. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. ज्या सदनिका आहेत त्या घोटाळ्यासंदर्भात हा दावा दाखल करण्यात आला होता. नाशिक जिल्हा न्यायालयाने हा निर्णय दिला असली तरी कोकोटे यांनी जामीन मिळवण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र कोकाटे यांची आमदारकीही धोक्यात येण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

माणिकराव कोकाटेंना जिल्हा न्यायालयाने दोन वर्षांची शिक्षा सुनावल्यावर आता ते हायकोर्टात अपील करू शकतात. जर या निर्णयाला स्टे मिळाला तर काही अडचण नाही, परंतु स्टे नाही मिळाला तर त्यांच्या सदस्यत्त्वाला धोका निर्माण होऊ शकतो. माणिकराव कोकाटे यांच्यावर ४२० कलमांतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अजितदादांचा दुसरा शिलेदार अडचणीत!

अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. धनंजय मुंडेंविरोधात शिंदे सरकारमध्ये कृषीमंत्री असताना घोटाळा केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यासोबतच संतोष देशमुख हत्या प्रकरणामध्ये धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. अशातच आता दादा गटाचे आमदार आणि मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने दणका दिला आहे. माणिकराव कोकाटे जामिनासाठी अर्ज दाखल करू शकतात. हे प्रकरण कोकाटेंच्या अंगलट येतं की काय हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

## अर्बन बँक घोटाळा प्रकरणात कर्जदाराजा ठोकल्या बेड्या

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

नगर अर्बन मल्टीस्टेट बँकेच्या सुमारे २९१ कोटींच्या कर्ज घोटाळा प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेने आणखी एका कर्जदाराला काल, बुधवारी सायंकाळी ताब्यात घेत अटक केली आहे. रवींद्र जेजुरकर (रा. ममदापूर, ता. राहाता) असे त्याचे नाव आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उप अधीक्षक गणेश उगले यांनी ही माहिती दिली.बँकेच्या कर्ज फसवणूक प्रकरणांमध्ये यापूर्वी अनेक संचालक व कर्जदारांना अटक करण्यात आलेली आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने शनिवारी खराडी बायपास (पुणे) येथून रवींद्र कासार या कर्जदाराला अटक केली होती. बुधवारी रवींद्र जेजुरकर याला ताब्यात घेऊन अटक केली आहे. त्याला कर्ज मंजूर करताना अनियमितता झाली असल्याचे समोर आल्याने त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

# एलसीबीने हेरला अन् बेड्या ठोकल्या

## शिवजयंती मिरवणुकीत गुंडाचा सहभाग

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

अहिल्यानगर जिल्ह्यातुन हद्दपार केलेला सराईत गुन्हेगाराला शिवजयंती मिरवणुकीतून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. सुनिलसिंग जीतसिंग जुन्नी ( रा. काटवनखंडोबा, अहिल्यानगर ) असे त्याचे नाव आहे. त्याचेविरुध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी शिवजयंती उत्सव शांततेमध्ये साजरा व्हावा यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांना जिल्ह्यातील हद्दपार आदेशाचा भंग करणाऱ्याविरूध्द कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्या अनुषंगाने त्यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील सपोनि/थोरात व पोलीस अंमलदार संदीप पवार, गणेश लोंढे, गणेश धोत्रे, रविंद्र घुंगासे, शाहीद शेख, पंकज व्यवहारे, जालींदर माने, सागर ससाणे, रोहित येमुल, विशाल तनपुरे, भाग्यश्री भिटे व ज्योती शिंदे अशांचे पथक नेमले.

त्यांना शिवजयंती मिरवणुक बंदोबस्तात हद्दपारआरोपी मिळून आल्यास कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पथकाला गुप्तबातमीदारा मार्फत हद्दपार असलेला सुनिलसिंग जुन्नी शिवजयंती मिरवणुकीमध्ये सहभागी झालेला असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने शिवजयंती मिरवणुकीमधून त्याला ताब्यात घेतले. त्याचेविरुध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास तोफखाना पोलीस करत आहे.

# रायगडमध्ये पाहुण्यांच्या नावे जमिनी घेतल्याचे उघड

## सचिन साबळे अन् प्रसाद साबळे दोघांचाही घातपात झाल्याचा संशय । संशयाची सुई संदीप थोरात याच्यावर । संशयास्पद मृत्यूची फाईल उघडण्याची आधार फाउंडेशनची मागणी

**जादा परताव्याचे अमिष दाखवत अनेकांना गंडा घालणाऱ्या संदीप थोरात याने मोठा गफला केल्याचे उघड झाले असून त्यातून मिळालेल्या रकमेतून त्याने रायगड जिल्ह्यात जमिनी घेतल्याची बाब समोर आली आहे. जवळच्या नातेवाईकांच्या नावे थोरात याने या जमिनी घेतल्या असून यासाठी संदीप थोरात याने त्याच्या विश्वासातील विश्वास पाटोळे याच्यावर जबाबदारी सोपविल्याचे समोर आले आहे. रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील वावेमांद्रज या गावातील सपना कदम आणि श्रीकांत कदम यांच्या मालकीची जमिन दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी खरेदी करण्यात आली आहे. संदीप थोरात याने त्याच्या अत्यंत जवळच्या नातेवाईकाच्या नावे ही खरेदी केली असल्याची कागदपत्रेच समोर आली आहेत. दरम्यान, संदीप थोरात याच्यासोबत कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या सचिन साबळे आणि प्रसाद साबळे या दोघांचाही संशयास्पद मृत्यू झाला असून त्यांचा घातपात संदीप थोरात यानेच केला असल्याचा संशय व्यक्त करत सदर प्रकरणाची फाईल पुन्हा उघडून त्याची चौकशी करण्याची मागणी आधार फौंडेशनच्या सचिन थोरात आणि अश्विन शिंदे यांनी पोलिस अधीक्षकांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. या दोघांनाही संदीप थोरात याच्या आर्थिक नाड्या माहिती होत्या आणि त्याने कोणाला कसे फसवले याचीही माहिती असल्याने संदीप थोरात यानेच त्यांचा घातपात केला असावा असा संशय व्यक्त केला जात आहे.**



स्पेशल रिपोर्ट

शिवाजी शिर्के, संपादक
९४२२२२१७६१

### नगर आणि महाबळेश्वरला घेतले राज्याचे अधिवेशन!

कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेल्या निधी कंपन्यांचे महाराष्ट्र राज्य निधी डेव्हलपमेंट असोसिएशन स्थापन करुन त्याचे राज्यस्तरीय अधीवेशन संदीप थोरात याने नगरमध्ये घेतले होते. याचवेळी त्यानी महाबळेश्वर येथेही दोन दिवसांचे अधीवेशन घेतले. महाबळेश्वर येथील अलिशान हॉटेलमध्ये हे अधीवेशन झाले. राज्यभरातील निधी कंपन्यांचे प्रतिनिधी त्यासाठी निमंत्रीत करण्यात आले. त्यांच्याकडून प्रत्येकी सात हजार रुपये शुल्क आकारण्यात आले. याशिवाय नगरमध्ये एका हॉटेलमध्ये दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी एक दिवसाची निधी परिषदही घेण्यात आली होती.

### सचिन साबळे याच्यावर होती सीइओ म्हणून जबाबदारी!

संदीप थोरात याच्या अत्यंत विश्वासू गोटातील कर्मचारी म्हणून सचिन साबळे हा राहिला. त्याच्या नावावर वेगवेगळ्या कंपन्या दाखवून संदीप थोरात याने त्याचा जसा गैरफायदा घेतला तसाच त्याने त्याच्यावर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या टाकूनही घेतला. नगर आणि महाबळेश्वर येथील निधी कंपन्यांच्या राज्यस्तरीय कार्यशाळा आणि बैठकांच्या नियोजनाची जबाबदारी संदीप थोरात याने याच सचिन साबळे याच्यावर दिली होती. त्यासाठी त्याला राज्यस्तरीय राज्य निधी डेव्हलपमेंट असोसिएशनचे सीईओ म्हणून नियुक्त केले होते. त्यावेळी या अनुषंगाने प्रसारीत करण्यात आलेल्या पत्रकांमध्ये आणि बातम्यांमध्ये सचिन साबळे याचा सीईओ म्हणून उल्लेख असल्याचे पुरावेही समोर आले आहेत.

### गोरगरिबांचे पैसे बायकोच्या 'माहेर'मध्ये गुंतवले!

संदीप थोरात याने सह्याद्री मल्टीनिधी कंपनीच्या विविध १९ शाखा दाखवल्या. त्या माध्यमातून नगर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून त्याने मोठ्या प्रमाणात पैसे जमा केले. जमा झालेल्या या पैशातून संदीप थोरात याने त्याच्या पत्नीच्या नावे माहेर ही वेगळी कंपनी स्थापन केली. ब्युटी पार्लरच्या नावाखाली ही कंपनी कार्यरत असल्याचे दाखवले. या कंपनीचे अत्यंत प्रशस्त असे ब्युर्टी पार्लरही सुरू करण्यात आले. त्यासाठी संदीप थोरात याने सह्याद्री मल्टीनिधीतील सुमारे चाळीस लाख रुपये पार्लरच्या उभारणीत घातल्याची बाबही समोर आली आहे.

### निधी कंपन्यांना एकत्र करत त्याचे फेडरेशन अन् त्याचा स्वयंघोषित अध्यक्ष!

राज्यभरात निधी कंपन्यांनी धुमाकूळ घातला असताना या कंपन्यांना एकत्रीत करण्याचे काम संदीप थोरात याने केले. राज्य आणि देशपातळीवर मल्टीस्टेट पतसंस्थांचे फेडरेशन आहे. काका कोयटे, सुरेश वाबळे, वसंत लोढा ही सहकारात काम करणारी दिग्गज मंडळी या फेडरेशनच्या माध्यमातून पतसंस्था चळवळीत काम करतात. त्यांच्या सारखेच आपणही राज्याचे नेते झालो असल्याचे संदीप थोरात याला वाटू लागले आणि त्याने राज्यभरातील निधी कंपन्यांना एकत्र करण्याची मोहीम राबवली. त्यातून काही कंपन्यांना हाताशी धरत त्याने राज्य निधी डेव्हलपमेंट असोसिएशनची स्थापना केली. या फेडरेशनची नोंदणी झाल्याचे आणि संदीप थोरात यांची राज्याच्या अध्यक्षपदी निवड झाल्याच्या बातम्या लागलीच त्याने छापून आणल्या. स्वत:च्याच अभिनंदनाची फ्लेक्स बोर्ड त्याने लावले. या फेडरेशनच्या उपाध्यक्षपदी महेंद्र गरुड यांची निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. यानंतर त्या माध्यमातून काम करत असताना सचिन साबळे याला या असोसिएशनचा म्हणजेच फेडरेशनचा सीईओ म्हणून नियुक्त करण्यात आल्याचे दाखविण्यात आले. नगरमध्ये पहिली बैठक आणि कार्यशाळा दाखविण्यात आल्यानंतर महाबळेश्वर येथील राज्यस्तरीय दोन दिवसांची कार्यशाळाही घेण्यात आली. संदीप थोरात याने या साऱ्या भूमिका इतक्या बेमालूमपणे वठवल्या की त्याच्यावरचा विश्वास वाढत गेला. मात्र, काही दिवसातच त्याचा खोटेपणा समोर आला आणि अनेकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या! अनेकांना ठेवींवर पाणी सोडावे लागले.



## सारिपाट/शिवाजी शिर्के

# राजे, आम्हाला (जमलं तर) माफ करा!

(पान १ वरून)

तुमचे चरित्र वाचायला गोड वाटते पण पचनी पडताना दिसत नाही. आधी लगीन कोंढाण्याचे म्हणण्याची आज तानाजीत हिंमत नाही, बापजाद्यांच्या पराक्रमांची आज रायबाला किंमत नाही.

आपलेच आपल्याला लुटायला लागले, परक्यांची आवश्यकता नाही. परक्यांनीच लुटले पाहिजे, हा काही त्यांचाच मक्ता नाही.

सुखी माणूस तोच, ज्याच्या अंगी खादीचा सदरा आहे. तो बघा ज्याचा प्रदेश, तिथेच त्याचा किल्ला व झेंडा आहे. फुरफुरणारे ते राजकीय घोडे, जमेल तसे उधळत आहे. कुणी वाजतोय टाळ्या, कुणी मोठ्याने खिदळत आहे. खूप झाल्या सेना, खूप झाले सेनापती, सैनिका-सैनिकांची वाटणी आहे. वाईट वाटण्याचे कारण नाही, आजच्या राजकारणाची हीच धाटणी आहे. निष्ठा दाखवायची खुमखुमी येता पटकन डिजिटल बॅनर डकवतो. राजे, चला तुम्हाला तुमचा महाराष्ट्र दाखवतो. शेतकऱ्यांची अवस्था अशी की, जसा वेढ्यामध्ये पन्हाळा आहे. बारा महिने तेरा त्रिकाळ त्यांच्या आयुष्यात उन्हाळा आहे.

राजे, चूकुनही बघू नका, त्यांची अवस्था कशी आहे? विषासाठी पैसा नसेल तर घराच्या आढ्याला फ़ाशी आहे. सरकार म्हणाले शिका, पोरं इथले शिकले आहेत. शिक्षणाची दुकाने तर वढ्या-वघळीला टाकले आहेत. जसे राजकारणाचे, तसेच आमचेही झाले आहे, स्वाहाकाराला बकासुरी रूप आले आहे. आया-बहिणींच्या इज्जतीची समस्या तर जटील आहे. नाक्या-नाक्यावर उभा जणू रांझ्याचा पाटील आहे. ज्याला त्याला आपली भूमिका, जबाबदारीने वठवावी लागेल. जर चुकून गेलाच तोल तर, सुभेदाराची सून आठवावी लागेल. आमच्यापैकी अनेक जण तुमची शिकवण आचरणात न आणता, तुमच्यासारखी करून वेशभूषा, झेंडा गाड्यांवर लावून बेफाम पणे उधळत आहेत, मद्यप्राशन करत डीजेवर उन्मादपणे थिरकत आहेत. राजे,यांना बावळे समजू नका, हे तर खरे शहाणे आहेत. तुम्हाला केलेय देव त्यांनी, तुमची इथे देवळे आहेत. राजे खरं सांगू, तुमच्या कल्पनेतलं रयतेचं राज्य दूर दूर कुठं दिसत नाही.

सूर्यकांत डोळस या मित्राने विडंबन करत जे काही लिहीलंय त्यात गैर काहीच वाटायला तयार नाही. राजे खरं सांगू का, कालच्याला तीन-चार पेग मीही जास्तच मारले हो! पण, आज ती झिंग उतरल्यावर मलाही उमजलंय की माझी काल किती मोठी चूक झालीय! राजे, काल ड्राय डे होताना! अहो राजे संपूर्ण दिवस आणि रात्रभर दारू विकली गेली! सांगा राजे असला ड्राय डे काय कामाचा!

हिंदुत्वाची लढाई नक्की खेळते कोण ही स्पर्धा नगर मध्ये सुरू झाली आहे! ही सारी थेरं आणि नाटकं आहेत! राजे, हे मला उमगलं पण, कालच्याला मीही जरा चुकलोच बरं! राजे नगर मधील सर्व प्रशासन नक्की कोणाच्या दावणीला बांधले आहे हो? दावन तीच आहे, राजे दावणीचा मालक बदललाय. राजे हा मालक शोधा! राजे होय तुम्हीच शोधा! कारण आम्हाला छत्रपती हवेत परंतु शेजारच्या घरात. राजे समजते ना तुम्हाला. राजे काळजी घ्या. आमचीही आणि तुमची. राजे, तुम्ही जन्माला याच पण शेजारच्या घरात! राजे, कालच्याला आम्ही चुकलो! पुन्हा चुकणार नाही हे ठाम विश्वासानं नाही सांगू शकत आम्ही! पण, राजे आम्हाला (जमलं तर) माफ करा इतकंच!

# अहिल्यानगरचा कॉपीमुक्ती पॅटर्न राज्याने अंगीकारावा

## प्रवीण दराडे; सचिवांनी एकाच वेळी अनुभवले सुमारे ६३ हजार विद्यार्थ्यांचे कॉपीमुक्त परीक्षा संचालन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री




राज्याच्या बोर्ड परीक्षेच्या भयमुक्त, कॉपीमुक्त व निकोप वातावरणातील परीक्षा उपक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याने प्रचंड मेहनत घेतलेली आहे. शिक्षण, पोलीस प्रशासन व महसूल विभागाने समन्वय साधून कॉपीमक्तीचे केलेले काम राज्याला निश्चितच आदर्श ठरले आहे. एकाच वेळी ६३ हजार विद्यार्थ्यांचे कॉपीमुक्त परीक्षेचे यशस्वी संचालन ही राज्यासाठी विशेष बाब आहे. विद्यार्थ्यांनी देखील परीक्षांमध्ये कॉपी न करता जीवनात यश संपादन करावे. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ संकल्पनेतील अहिल्यानगरचा आनंददायी परीक्षा पॅटर्न राज्याने निश्चितच अंगीकारण्याचे आवाहन अहिल्यानगरचे पालक सचिव तथा प्रधान सचिव (सहकार व पणन विभाग, मंत्रालय) प्रवीण दराडे यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात विविध बैठकांचे आयोजन दराडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या दरम्यान त्यांनी कार्यालयातील परीक्षेच्या विशेष वॉररूमला सुमारे अर्ध्या तासाची विशेष भेट देऊन कॉपीमुक्तीच्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती जाणून घेतली. यावेळी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र पाटील, उपजिल्हाधिकारी राहुल पाटील, मनपा आयुक्त यशवंत डांगे, प्रांताधिकारी सुधीर पाटील तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

दहावी-बारावीच्या सर्व पेपरसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त व शिस्तीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांचे मार्गदर्शन लाभत आहे. शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या मार्गदर्शनाने कार्यरत जिल्हास्तरीय दक्षता समितीच्या मास्टर प्लॅन अंतर्गत निर्मित या पॅटर्नच्या वेबपेजचे दराडे यांनी विशेष कौतुक केले.शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी वॉररूमबद्दल व कॉपीमुक्तीच्या जनजागरण उपक्रमाबद्दल माहिती दिली. उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर यांनी १०९ केंद्रांतील १५८५ ब्लॉकमधील ६३ हजार विद्यार्थ्यांचे कॉपीमुक्त संचालन कसे होते याचे प्रात्यक्षिक दाखवले. या उपक्रमाची दराडे यांनी विशेष माहिती घेत हा पॅटर्न अजून आदर्श होण्यासाठी मार्गदर्शक सूचना केल्या. शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे (योजना), शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात, सुरेश ढवळे, वॉर्डरूम संचालक लहू गिरी, जितीन ओहोळ, भावेश परमार, तांत्रिक सहायक डॉ. अमोल बागुल आदींनी यावेळी मॉनिटरिंग उपक्रमात सहभाग दर्शविला.

# जगात फक्त हिंदुस्थानातील मुस्लिम सुखी : टायरवाले

## किर्लोस्कर फेरस कंपनीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

शिवाजी राजे नसते तर आज आपण कुठे असतो? आपले काय झाले असते? आपली नावे काय असती याचा विचार करा. हिंदुस्थानाने अनेक देशांतील लोकांना आश्रय दिला आहे. आज जर मुस्लिम राष्ट्राची परिस्थिती पाहिली तर सगळीकडे मारामारी, अराजकता आहे. फक्त हिंदुस्थानात मुस्लिम सुखी आहेत, असे प्रतिपादन नगर जिल्हा मजदूर सेना अध्यक्ष बाबूसेठ टायरवाले यांनी केले.

एमआयडीसी तील किर्लोस्कर फेरस कंपनी मध्ये तीनही विभागांत (प्लॅण्ट) शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी नगर जिल्हा मजदूर सेना अध्यक्ष बाबूसेठ टायरवाले यांच्या हस्ते मूर्तीचे पूजन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्लांटहेड चैतन्य शिंदे, संघटनेचे सरचिटणीस वसंत सिंग, कंपनी मानव संसाधन प्रमुख कैलास गुरव, विकास जोशी, रोहित धाडगे, युनिट अध्यक्ष राजू वाकळे, संघटना पदाधिकारी राजेंद्र पाटील, कचरू ढगे, जलील शेख, संजय शिरसाठ, के. आर. धाडगे उपस्थित होते. तसेच तिन्ही विभागांतील अधिकारी, कामगार उपस्थित होते

हिंदूचे विचार कोणाच्या धर्माच्या विरोधात नाही हे आम्हाला शिवाजी राजांनी शिकवले आहे. आम्ही कोणाच्या धर्माच्या विरोधात नाही पण आमच्या धर्मावर जे कोणी आघात करतील त्यांचा आम्ही बंदोबस्त केल्याशिवाय राहणार नाही असेही बाबूशेठ टायरवाले म्हणाले. आज पाश्चात्त्य लोक आपल्या हिंदू संस्कृतीकडे आकर्षित होत आहे आहेत. आपण आपल्या मुलांना लहानपणापासून छत्रपती शिवाजी महाराज शिकविले पाहिजे. त्यांची पुस्तके मुलांना वाचायला दिली पाहिजेत. त्यांचा इतिहास जर या नवीन पिढीला जर कळला नाही तर भविष्यात आपल्या हिंदूंचे रक्षण करण्यासाठी ते कसे तयार होतील, असे श्री. टायरवाले म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आपण अमलात आणले पाहिजेत. नुसती जयंती केली व एक दिवस जयजयकर केला असे न होता त्यांचे विचारांचे अनुकरण काम केले पाहिजे. छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा चित्रपट सर्वांनी पाहायला पाहिजे. त्यांना किती क्रूर पद्धतीने मारण्यात आले. त्यांनी सांगितले मी धर्म बदलणार नाही. मग आपण विचार केला पाहिजे की आपण आपल्या हिंदू धर्माशी एकनिष्ठ राहिलं पाहिजे असेही श्री. टायरवाले म्हणाले. यावेळी तीनही ठिकाणी शिवमूर्तीचे पूजन करून मिठाई वाटप करण्यात आली. यावेळी अनेकांनी आपली मनोगते व्यक्त केली.

# शिवजयंतीनिमित्त विनायकराजं प्रतिष्ठानच्या वतीने रक्ततपासणी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री

गुलमोहर रोड येथे विनायकराजं प्रतिष्ठातचे अध्यक्ष विपुल वाखुरे व विनय वाखुरे यांच्यामार्फत मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. प्रथम शिवमूर्तीचे पूजन परिसरातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या वर्षी शिवजयंतीनिमित्त मोफत रक्ततपासणी शिबिर ठेवण्यात आले होते. त्याचाही शुभारंभ करण्यात आला. या शिबिरात १२ विविध तपासण्या करण्यात आल्या. शिबिरात १००८ नागरिकांनी सहभाग घेतला. शिबिरास प्रतिष्ठानचे मार्गदर्शक डॉ. हर्षल पटारे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रतिष्ठानचे मार्गदर्शक बेरड सर, जित साहेब, संगमकर सर, व्यास सर, प्रदीप वाखुरे, मेहता काका व पदाधिकारी अनिल लगड, अतुल देव्हारे, निखिल मोयल, संदीप चौधरी, महेश डोखे, सागर ठाकुर, मयूर कुलकर्णी, प्रणव गांधी, निखिल कोल्हारे, अक्षय घोरपडे, ओम जरे, गौरव परदेशी, आदित्य आढाव, अंकित धोत्रे, सागर उकिर्डे, सुरज कर्डिले, नीलेश तिमोणे, राहुल दुधाले, सचिन कलंके, पार्थ दळवी, निशिगंध प्रभुणे, अमित आव्हाड, आकाश गायकवाड यांनी मोलाचे योगदान दिले.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME **BHANAGE CHARUDATT VASUDEV** TO NEW NAME **BHANAGE CHARUDATTA VASUDEV**

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME **MUNNI HARUN RASHID SHAIKH.** TO NEW NAME **MUMTAZ SHAMSHUDDIN ATTAR.**
AADHAR NO. 9579712071

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विद्यमान मालक **रोहन मोहन गाडेकर रा. शहापुर ता नगर जि. अहिल्यानगर** यांची आहे तरी सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की सदर शेतजमिन या मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, इक्वीटेबल मॉरगेज, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर शेतजमिन मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत असे समजले जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि ।। अहिल्यानगर सब डि।। व तालुका नगरपैकी अ.नगर जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **भिंगार येथील गट नं. ९२/अ/ २ब याचे क्षेत्र ० हे ७६ आर यापैकी रोहन गाडेकर यांचे मालकीचे क्षेत्र 0हे - १0 आर या मिळकतीबाबत.**

**यांसी चतु:सिमा- महसुल रेकॉर्डप्रमाणे.**

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमिन मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.

सही-
**ॲड. अभिजीत बाळासाहेब आवारी**
ऑफीस नं. २, पराग बिल्डीग, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, अहिल्यानगर, मो नं. ९८८१२७१२२४

शिक्का

अहिल्यानगर
दिनांक :- २०/०२/२०२५

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिरिष्ट वर्णन केलेली प्लॉट मिळकत हि विद्यमान मालक **सुधाकर आनंदराव आकोलकर रा. नवनागापुर, ता नगर जि अहिल्यानगर** यांची आहे तरी सदर जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की सदर प्लॉट मिळकती बाबत कोणतेही साठेखत, खरेदीखत, गहाणखत, इक्वीटेबल मॉरगेज, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात **(७) दिवसाचे** आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्या सह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकती निर्वेध व निजोखमी आहेत असे समजले जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-** डि।। अहिल्यानगर सब डि ।। व तालुका नगरपैकी अ. नगर जिल्हापरिषद हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अ.नगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे **नवनागापुर येथील नवा सर्व्हे नं. ९४/२ जुना सर्व्हे नं. १०४/२ मधील प्लॉट नं. १२ याचे क्षेत्र २१0.00 चौ. मी. या मिळकतीबाबत.**

**यांसी चतः सिमा-**
पुर्वेस : अंतर्गत रस्ता
दक्षिणेस : अंतर्गत रस्ता
पश्चिमेस : प्लॉट नं. ११
उत्तरेस : सर्व्हे नं. १०४/१ पैकी

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक प्लॉट मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत

सही-
**ॲड. अभिजीत बाळासाहेब आवारी**
ऑफीस नं. २, पराग बिल्डीग, जुने जिल्हाधिकारी कार्यालयाशेजारी, अहिल्यानगर, मो नं. ९८८१२७१२२४

शिक्का

अहिल्यानगर
दिनांक :- १८/०२/२०२५


# बालरंगभूमी परिषद सभासदांसाठी शनिवारी मोफत आरोग्य शिबिर

अहिल्यानगर । नगर सह्याद्री





मध्यवर्ती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष ॲड. नीलम शिर्के-सामंत यांच्या प्रेरणेने येथील बालरंगभूमी परिषद अहिल्यानगर शाखा आयोजित व पिनॅकल क्लिनिक व डेंटल केअर यांच्या सहकार्याने खास बालरंगभूमी परिषदेच्या सभासदांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ०२ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

या मोफत आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉ. पुष्कराज श्रीकांत कुलकर्णी आणि डॉ. प्रियंका पुष्कराज कुलकर्णी हे तपासणी करणार असून ब्लड शुगर, बीपी, वजन, इसीजी, डायेट कन्सल्टिंग आणि दातांची तपासणी करणार आहेत. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध आयुर्वेद तज्ज्ञ वैद्यअजय देशमुख हे संधिवात, गुडघे दुखणे, कंबर दुखणे तसेच केस गळणे, त्वचेच्या आजारांवर मार्गदर्शन करणार आहेत. शिबिराचे ठिकाण पिनॅकल हॉस्पिटल व डेंटल क्लिनिक, मेड बाजार समोर प्रेमदान चौक, अहिल्यानगर असेल. तरी बालरंगभूमी परिषदेच्या जिल्ह्यातील सर्व सभासदांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्षा उर्मिला लोटके यांसह प्रमुख कार्यवाह प्रसाद भणगे यांसह शिबिर प्रमुख शैलेश देशमुख व तेजा पाठक यांनी केले आहे. शिबिर यशस्वी करण्यासाठी सतीश लोटके, अनंत जोशी, विराज अडगटला, देवीप्रसाद सोहोनी, सागर अलचेट्टी, प्रशांत सूर्यवंशी, अविनाश बोधले, तेजस अतितकर, सुजाता पायमोडे, टीना इंगळे, सोनाली दरेकर, श्रिया देशमुख, सपना साळुंके व ऋतुजा पाठक परिश्रम घेत आहेत.

# 'आयकॉन स्कूल'मध्ये आजी-आजोबा दिन साजरा

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



आयकॉन पब्लिक स्कूलने नुकताच आजी-आजोबा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. नातवंडांचे जीवन घडवण्यात आजी-आजोबा अमूल्य भूमिका बजावतात. त्यांच्या सन्मानार्थ हा कार्यक्रम घेण्यात आला. आयकॉन पब्लिक स्कूलच्या प्री-प्रायमरी विभागाच्या मुलांसाठी हा कार्यक्रम घेण्यात आला.

उत्सवाची सुरुवात स्वागताने झाली. यात विद्यार्थी आणि शिक्षकांनी आजी-आजोबांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे मुलांनी त्यांच्या आजी-आजोबांची ओळख करून दिली. त्यांच्या मार्गदर्शन आणि प्रेमाबद्दल मनापासून बोलले. शाळेने पालकांना बालपणीच्या आठवणी सांगण्यासाठी आमंत्रित केले. सर्वांना काळाच्या ओघात एका जुन्या प्रवासात घेऊन गेले. कार्यक्रमात उत्साहाचा स्पर्श जोडत, 'पासिंग द पार्सल' हा एक मजेदार खेळ आयोजित करण्यात आला होता. ज्यामध्ये आजी-आजोबा आणि मुले दोघांसाठी परस्परसंवादी प्रश्नांचा समावेश होता. सहभागींनी त्यांच्या आनंददायी प्रतिक्रिया दिल्याने हास्य आणि आनंदाने वर्ग भरून गेला. ग्रुप फोटोने या प्रसंगाची स्मृती टिपली. पिढ्यानपिढ्या असलेले सुंदर बंध जपले. त्यानंतर जुन्या गाण्यांचा आणि अंताक्षरीचे एक सत्र झाले. यात आजी-आजोबांनी उत्साहाने भाग घेतला आणि संगीताच्या माध्यमातून त्यांच्या सोनेरी आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाची सांगता आभार मानून आणि अल्पोपहार देऊन झाली. आयकॉन पब्लिक स्कूल मजबूत कौटुंबिक मूल्ये जोपासण्याची आणि आजी-आजोबा त्यांच्या नातवंडांच्या जीवनाचा अविभाज्य भाग राहतील याची खात्री करण्याची आपली वचनबद्धता कायम ठेवत आहे. शाळेचा असा ठाम विश्वास आहे की असे उत्सव पिढ्यांमधील बंध मजबूत करतात, विद्यार्थ्यांसाठी प्रेमळ आणि संगोपन करणारे वातावरण तयार करतात. कार्यक्रमाच्या शेवटी, मुख्याध्यापिका दीपिका नगरवाला यांनी पालक आणि आजी-आजोबांचे त्यांच्या अतूट प्रेम, पाठिंब्याबद्दल आणि उपस्थितीबद्दल मनापासून आभार मानले.

# 'शिवप्रेमी मुस्लिम मावळा'च्या शिबिरात ४७ जणांचे रक्तदान

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



केडगाव येथील शाहूनगर भागात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवप्रेमी मुस्लिम मावळा संघटना व काजवा बहुद्देशीय संस्था यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये ४७ जणांनी रक्तदान केले.

यावेळी कोतवली पोलीस ठाण्याचे एपीआय श्रीमती कोकाटे, सचिन लोळगे, श्रीमती दरंदले, शिंदे दादा, गायकवाड दादा, संघटनेचे पदाधिकारी रफिक पठाण, समीर शेख, संघटनेचे मार्गदर्शक प्रतीक बरसे, ब्लड बँकेचे विश्वनाथ पटांगे, सुप्रिया पवार, संतपाल देशमुख, राजेश्वरी पवार आदीसह संघटनेचे पदाधिकारी होते. रक्तदान करणाऱ्यांमध्ये अल्ताफ पठाण, समीर मारी, युसूफ वायरमन, आनंद पाल, रिजवान खान, सुभाष जाधव, साहिल शेख, सिराज शेख, शफीक पठाण, मोहसीन पठाण, फैजान सय्यद, साबीर पठाण, शामवेल पाटोळे, विकी सिंधू, रोहित शेख, इमरान शेख, शाहरुख तांबोळी, आकाश संगापूरकर, इरफान शेख, मुजम्मिल पठाण, प्रमोद क्षीरसागर, फरान काझी, नाझीम शेख, मुस्तकीम शेख, आसिफ शेख, आयान शेख, शानू शेख, युसुफ शेख, अरकान शेख, साहिल पठाण, ऋषिकेश नेमाणे, भूषण गुंड आदींचा समावेश होता. संघटनेचे पदाधिकारी शफी पठाण व काजवा संस्थेचे अध्यक्ष प्रवीण धांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

नगर सह्याद्री हे दैनिक मुद्रक, प्रकाशक व मालक शिर्के शिवाजी अप्पाजी यांनी समाचार प्रेस, ४१८८, मैदान आड, लक्ष्मी कारंजा, अहिल्यानगर- ४१४००१ येथे छापून सह्याद्री पब्लिकेशन, फ्लॅट नं. १०, कुंदननगरी अपार्टमेंट, डॉ. आंबेडकर रोड, माळीवाडा, अहिल्यानगर -४१४००१ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. RNI No.MAHMAR/2013/59865 *संपादक - शिर्के शिवाजी अप्पाजी, मो. ९४२२२२१७६१, निवासी संपादक- चोभे सुनील सुरेश, फोन नं. ०२४१-२३४१७६१,
Email-nagarsahyadri@gmail.com (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे. वादविवाद अहमदनगर न्यायकक्षेत)
**Daily Nagar Sahyadri** Printer, Publisher and Owner by Shirke Shivaji Appaji Printerd at Samachar Press,4188, Maidan aad, Laxmi Karanja, Ahilyanagar-414001 (Maharashtra) And Pubished at **Sahyadri Publication**, Flat No.10, Kundannagari Appartment, Dr. Ambedkar Road, Maliwada, Ahilyanagar-414001 (Maharashtra) ***Editor- Shirke Shivaji Appaji Mob.9422221761,**
**Resi. Editor -Chobhe Sunil Suresh**, Ph. No.0241-2341761 • Vol-12 • Issue No.102 • Prize Rs.3/- • Pages -4 • 21/02/2024

# राळेगण थेरपाळ येथे शिवजयंती उत्साहात



राळेगण थेरपाळ | नगर सह्याद्री

राळेगण थेरपाळ (ता पारनेर) येथे विविध कार्यक्रमांने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. युवकांनी किल्ले रायगड येथून आणलेल्या शिवज्योतीची झांज पथकाच्या सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करत आरती करण्यात आली. यावेळी शिवगर्जनेने परिसर दुमदुमून गेला होता.

जवळा जिल्हा परिषद शाळेने महाराष्ट्राची लोकधारा, लेझीम पथनाट्य सादर केले. कोहोकडी, राळेगण, जवळा, माजमपूर, जाधव वाडी, घावटे वस्ती शाळेतील विद्यार्थ्यनी वेशभूषा, भाषण, पथनाट्य कार्यक्रमात सहभाग नोंदवला. तसेच रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व स्पर्धांसाठी जिल्हा परिषदेचे माजी उपअध्यक्ष सुजित पाटील झावरे यांच्यासह ग्रामस्थांनी मोठी बक्षिसे ठेवली होती.

वेशभूषा स्पर्धेतील पहिल्या गटात मयुर झरेकर (प्रथम), सारिका औटी (द्वितीय), वैष्णवी मंडले (तृतीय), दुसऱ्या गटात शर्वरी शितोळे (प्रथम), सई सुपेकर (द्वितीय), काव्या कारखिले (तृतीय), तिसऱ्या गटात आराध्या झरेकर (प्रथम), अनुष्का कारखिले (द्वितीय), तनिष्का सालके (तृतीय) क्रमांक मिळवला तसेच

रांगोळी स्पर्धेमध्ये रजनी शिंदे (प्रथम), सेजल दुर्गे (द्वितीय), श्रेया शेवकर (तृतीय), सुवर्णा रामकर (चतुर्थ) उर्मिला डोमे क्रमांक मिळवला. स्पर्धकांना आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डीवायएसपी पदी सागर कदम, उपआयुक्त पदी वैभव पडवळ तसेच गौरव वांडेकर, सुनील सालके, स्वप्नील सालके, सचिन पवळे यांच्या निवडीबद्दल सत्कार करण्यात आला. संध्याकाळी सहा वाजता संपूर्ण गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. सायंकाळी गणेश महाराज फडतरे यांचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.

# ‘स्वराज्य सप्ताह’ हा शिवरायांच्या विचारांचा जागर

## आमदार काशीनाथ दाते | पारनेर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने कार्यक्रम

पारनेर | नगर सह्याद्री

राज्य रयतेचे जिजाऊंच्या शिवबाचे या टॅगलाईनखाली आयोजित स्वराज्य सप्ताह म्हणजे शिवरायांच्या विचारांचा जागर आहे, असे प्रतिपादन आमदार काशीनाथ दाते यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मरण करत असताना आजच्या बाल आणि युवा पिढीत शिवरायांचे विचार भिनवून तळागाळात पोचविण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेसने स्वराज्य सप्ताहानिमित्त केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने स्वराज्य सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. स्वराज्य सप्ताहाचा शुभारंभ आमदार काशीनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. त्यावेळी आमदार दाते बोलत होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, माजी नगराध्यक्ष विजय औटी, जिल्हा उपाध्यक्ष कापसे सर, महिला तालुकाध्यक्ष सुषमा रावडे, युवक तालुकाध्यक्ष भास्कर उचाळ, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर, विठ्ठल कवाद, अप्पासाहेब कळमकर, समीर झगडे, सुधीर करंजुले मेजर आदींसह पक्ष कार्यकर्ते उपस्थित होते.

**राष्ट्रवादी महापुरुषांचे विचार जपणार**

आपल्या छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण ध्यानात ठेवून प्रत्येक कामातून स्त्रीशक्तीचा सन्मान राष्ट्रवादी आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार करत आहेत. त्याच अनुषंगाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

– विक्रमसिंह कळमकर, तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस



# नारायणगव्हाण येथे शिवजयंती उत्साहात साजरी



सुपा | नगर सह्याद्री

पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाणच्या शिवमावळ्यांनी मंगळवार दि. १८ रोजी संध्याकाळी सात वाजता शिवज्योत आणण्यासाठी किल्ले शिवनेरी कडे प्रस्थान केले. रात्री बारा वाजता मावळ्यांनी किल्ले शिवनेरीवर शिवज्योत पेटवून नारायणगाव, पारगाव, मलठण, रामलिंग, शिरूर, वाडेगव्हाण मार्गे नारायणगव्हाण मध्ये पायी येत ती शिवज्योत आणली. सर्व ठिकाणी शिवज्योतीचे भव्य स्वागत करण्यात आले.

बुधवार दि. १९ रोजी शिवज्योतीचे नारायणगव्हाणमध्ये आगमन होताच ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. शिवज्योतीची नारायणगव्हाण मध्ये भव्य अशी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत गावातील व सर्व मळ्यातील, वाड्या वस्तीवरील शिव मावळ्यांनी तसेच सर्व माता भगिनींनी उत्स्फूर्त पणे सहभाग नोंदवला. गावातील सर्वांच्या घरासमोर सडा टाकून रांगोळी काढण्यात आली होती. शिवजन्मोत्सव च्या दिवशी गावातील वातावरण शिवमय झाले होते. शेवटी श्रीराम मंदिरात छत्रपतींच्या पुतळ्याला पुष्पहार घालून शिवआरती घेण्यात आली व नंतर सर्वांना महाप्रसाद देण्यात आला.

# पारनेर तालुका गुणवंताची भूमी

## वसंत कवाद | मळगंगा ट्रस्टकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

निघोज | नगर सह्याद्री

निघोज परिसरातील शेकडो विद्यार्थी उच्चपदावर कार्यरत आहे. विद्यर्थ्यांना घडवण्यासाठी विद्यालय, महाविद्यालय तसेच शरदचंद्रजी पवार अभ्यासिका यांचे मोठे योगदान लाभले असून पारनेर तालुका गुणवंताची भूमी असल्याचे प्रतिपादन मळगंगा ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद यांनी केले.

मळगंगा ट्रस्ट सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मळगंगा ट्रस्टचे उपकार्याध्यक्ष वसंत कवाद, माजी सरपंच ठकाराम लंके, सचिव शांताराम कळसकर, सहसचिव विश्वासराव शेटे, संतोष रसाळ,शंकरराव लामखडे, रोहिदास लामखडे, अनिल शेटे, योगेश खाडे, बबनराव ससाणे, रमेश ढवळे, अशोक वरखडे, विश्वस्त ॲड. ज्ञानेश्वर लामखडे आदींच्या हस्ते करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले स्वप्नील संतोष सालके, सुनिल दादाभाऊ सालके, सचिन बाळासाहेब पवळे, प्राजक्ता हिराभाऊ तांबे, बाबुराव नामदेव कारखिले तसेच सागर कैलास नरसाळे यांची मुंबई पोलीस पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रुपेश ढवण, यशवंतराव वराळ, दिलीप कवाद, असिमभाई हवालदार, शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेचे व्यवस्थापक शेळके, महेश ढवळे, उपव्यवस्थापक रोहन उनवणे, लेखणीक सागर ईरोळे, ओम प्रकाश उनवणे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विश्वस्त संतोष रसाळ यांनी केले तर शेवटी आभार रुपेश ढवण यांनी मानले.



**निघोज परिसरात शैक्षणिक संस्कृतीला चालना**

मळगंगा ट्रस्टचे संस्थापक बाबासाहेब कवाद यांनी निघोज परिसरात शैक्षणिक संस्कृतीला मोठ्या प्रमाणात चालना दिली. विद्यार्थ्यांना इंग्रजी शिक्षण घेता यावे तसेच इंग्रजी बोलता यावी यासाठी न्यू इंग्लिश स्कूलची निर्मिती केली. त्यामुळे निघोज परिसरातील शैक्षणिक संस्कृतीसाठी कवाद यांचे मोठे योगदान आहे.

– शांताराम कळसकर, सचिव मळगंगा ट्रस्ट

**मळगंगा ट्रस्टचे मोलाचे मार्गदर्शन**

पदवीधर झाल्यानंतर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होण्याचा संकल्प होता. यासाठी शरदचंद्रजी पवार अभ्यासिकेत मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले असल्याचे मनोगत संतोष सालके, प्राजक्ता तांबे यांनी व्यक्त केले.

# शिवजयंती उत्सव उत्साहात साजरा



निघोज | नगर सह्याद्री

निघोज येथील संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष अप्पासाहेब वराळ पाटील यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई संदीप वराळ पाटील, सरपंच चित्राताई सचिन वराळ पाटील तसेच परिसरातील महिला बचत गटाच्या पदाधिकारी व सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी मान्यवर व ग्रामस्थ यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई संदीप वराळ, सरपंच चित्राताई सचिन वराळ पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जय भवानी जय शिवाजी या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# घुगलवडगाव येथील प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी



श्रीगोंदा | नगर सह्याद्री

घुगलवडगाव (ता. श्रीगोंदा) येथील प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक दांगडे, उपाध्यक्ष भरत पवार उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थी शिवराज भरत पवार, अक्षरा सचिन पवार, मनस्वी गणेश दांगडे , श्रद्धा शिवाजी दांगडे, रोहित मधुकर पवार, माऊली महेश पवार, जानवी गणेश दांगडे, सार्थक महेंद्र देशमुख, हर्षद राजू गलांडे, श्रुतिका रवींद्र गलांडे, स्वराली सदाशिव गलांडे, ओम किरण गलांडे आदींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्या विषयी मनोगत व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक इंगवले सर, उपमुख्याध्यापिका जगताप मॅडम, रोहिदास दांगडे, गौतम दांगडे, नितीन दांगडे, ज्ञानेश्वर दांगडे, भागवत पाचपुते, जालिंदर लोखंडे, केशव दांगडे, ईश्वर दांगडे, योगेश गलांडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक दरेकर यांनी केले तर आभार इंगावले यांनी मानले.

# गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी परवानगी द्या

## संतोष वाडेकर | वारणवाडी येथे भूमिपुत्र कृती समितीची स्थापना

पारनेर | नगर सह्याद्री

गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी बंदी असल्यामुळे पावसाळ्यात पडणारे सगळे पाणी वाहून जाते. त्यामुळे उन्हाळ्यात हातातोंडाशी आलेले पिके सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यावर येते. त्यामुळे गोदावरी खोऱ्यात बंधारे बांधण्यासाठी असलेली बंदी उठवा तसेच तांबडीकार धरण व वारणवाडी येथील शिपाई चोंडी बांधारा बांधण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी भूमिपुत्र संघटनेचे संतोष वाडेकर यांनी केली.

पारनेर तालुक्यातील दुष्काळी गावांना शेतीसाठी कुकडी प्रकल्पातून हक्काचे पाणी मिळावे, यासाठी भूमिपुत्र संघटनेच्या वतीने गाव तिथे कृती समिती अभियान सुरू आहे. वारणवाडी येथे कृती समितीची स्थापना करण्यात आली. यावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक संतोष वाडेकर बोलत होते. यावेळी सरपंच संजय काशीद, भाऊसाहेब कोकाटे, अन्सार पटेल, महेंद्र काशीद, संजय भोर, विशाल कोकाटे, सचिन कोकाटे, चेअरमन संजय भोर,अशोक बेलकर, नानाभाऊ काशीद, पंडित गायके, बाबासाहेब काशीद, अक्षय गुंड, संतोष पानमंद, विशाल थोरात, मंजाबापू वाडेकर, पांडुरंग बेलकर, राहुल काशीद, विष्णू काशीद, पांडुरंग पानमंद, सुशील थोरात, राजेंद्र कोकाटे, जयसिंग काशीद, पाटील काशीद, जगदीश बेलकर, नवनाथ कराळे, अर्जुन कोकाटे, गणेश काशीद, विठ्ठल काशीद, पांडुरंग कोकाटे, अमोल पानमंद, विलास बेलकर, विश्वास थोरात, जनार्दन काशीद, उत्तम कोकाटे, विकास काशीद, किसन काशीद, ज्ञानेश्वर कोकाटे, विक्रम कोकाटे, नीलेश काशीद, सतीश काशीद, तुषार गुंड, बाळू काशीद, गणपत चौधरी, अशोक काशीद, प्रवीण रोकडे, हरी कोकाटे, सुरेश बेलकर, पंढरीनाथ कोकाटे, बाबाजी काशीद, विष्णू बेलकर, धोंडीबा काशीद, विष्णू कोकाटे, सुरेश काशीद, संतोष काशीद, नवनाथ पानमंद, राजेंद्र गुंड, बबन कोकाटे, पोपट काशीद, बाळासाहेब गायके, तुषार काशीद, बाबाजी कोकाटे ,बबन थोरात, हनुमंत थोरात, लक्ष्मण चौधरी, विनोद काशीद आदी उपस्थित होते.



# शिवबा संघटनेच्या वक्तृत्व स्पर्धेला मोठा प्रतिसाद

सुपा | नगर सह्याद्री

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त शिवबा संघटनेच्या वतीने आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे यांनी दिली. तसेच स्पर्धेत अध्यक्ष बबनराव तनपुरे, राजूशेठ लाळगे, बाळासाहेब भंडारी, ज्ञानेश्वर कवडे सर, रायचंद गुंड, यश शेटे यांच्या वतीने बक्षिसे देण्यात येणार आहे.

स्पर्धेमध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये तालुकास्तरीय वकृत्व स्पर्धेत प्रथम गटात कु. संस्कृती संतोष सालके (प्रथम), कु. प्रज्ञा शरद ठुबे (द्वितीय), कु. विरोनिका दशरथ लामख (तृतीय), उत्तेजनार्थ कु. शिवांजली लहू लंके (प्रथम), कु. आर्या राजू औटी (द्वितीय) तर द्वितीय गटात कु. आद्या नीलेश झावरे (प्रथम), कु. सिद्धी बाबुराव व्यवहारे (द्वितीय), कु. हर्षदा ताराचंद दळवी (तृतीय), उत्तेजनार्थ चि. अर्शाद समीर शेख (प्रथम), कु. मृदुला सतीश माघाडे (द्वितीय), तृतीय गटात डॉ. गौरव राजेंद्र मंडलिक (प्रथम), कु. सिद्धी दत्तात्रय धुंधाव (द्वितीय) चि. ऋतिक ज्ञानेश्वर थोरात यांनी तर उत्तेजनार्थ कु. कोमल खंडू जगताप यांनी संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवबा संघटनेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे. शिवबा संघटनेच्या पदाधिकारी व सदस्य यांच्या वतीने मंगळवार १८ रोजी शिवनेरी किल्ल्यावरून आणलेल्या शिवज्योतचे ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. यावेळी जय भवानी जय शिवाजी या जयघोषाने परिसर निनादून गेला होता.

# ब्लूमिंग बड्स विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी



सुपा | नगर सह्याद्री

पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण येथील ब्लूमिंग बड्स विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर शिवाजी महाराज यांचा पाळणा म्हणण्यात आला. यावेळी संस्थापक अध्यक्ष धनंजय नाईक यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास मुलांना सांगितला.

यावेळी विद्यार्थ्यांनीही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्यावरती छान भाषणे सादर केली. सुंदर नृत्य सादर केले. पोवाडे गायले गेले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची लेझिम, ढोल वाजवत मिरवणूक काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या घोषणेने वातावरण आनंदमय झाले होते. कार्यक्रमाचे सर्व नियोजन विद्यार्थ्यांनी खूप छान पद्धतीने करून कार्यक्रम यशस्वी केला यासाठी सर्वांचे आभार मानण्यात आले.

# लेझीम पथकाने रंगला गुरुदेव शिवजयंती उत्सव

सुपा | नगर सह्याद्री

शिवजयंतीनिमित्त सुपा शहरांमध्ये गुरुदेव शिक्षण संस्थेची मिरवणूक पार पडली. मिरवणुकीत आठ पथकांचा समावेश होता. त्यातील गावठी लेझीम पथक आकर्षण ठरले. त्याचबरोबर मुलींनी लाठीकाठी, तलवारबाजी व साहसी खेळ सादर केले.

मिरवणुकीत ज पथक, लेझीम पथक, ढोल-ताशा पथक, घोडे भगव्या पताका पथक, पारंपारिक दुमदुमणारे ढोल ताशांचा आवाज आसमंतात दुमदुमत होता. फटाक्यांची आतषबाजी व गुरुदेव शिक्षण संस्थेची शिस्तबद्ध मिरवणूक सर्वांचेच लक्ष वेधून घेत होती. सुपा एसटी स्टँड चौकात रायतळे येथील तरुणांनी भाग घेत लेझीम नृत्य सादर केले. शिवतीर्थ चौकात मिरवणुकीचे भाजप युवा नेते सागर मैड, अमोल मैड यांनी स्वागत केले. यावेळी पीआय सोमनाथ दिवटे, पीएसआय जेजोट मॅडम, पीएसआय कानगुडे, प्रशांत दिवटे, मधुकर पठारे, संतोष गायकवाड, दत्ता नाना पवार, कानिफ पोपळघर, डॉ. बाळासाहेब पठारे, डॉ. खामकर उपस्थित होते. मिरवणुकीचे नियोजन गुरुदेव शिक्षण संस्थेचे संस्थापक सुभाष मगर, अध्यक्ष संतोष मगर यांनी केले. सूत्रसंचालन मंगेश चितळकर यांनी केले. प्राचार्य तुषार कदम यांनी आभार मानले.

# सुप्यात शिवजयंती उत्साहात साजरी

सुपा | नगर सह्याद्री



पारनेर तालुक्यातील सुपा परीसरातील सुपा, हंगा, मुंगशी, वाघुंडे, आपधूप, वाळवणे, रायतळे, अस्तगाव, पिंपरी गवळी, रांजणगाव मशीद, रूईछत्रपती, बाबुर्डी, भोयरे गांगर्डा, कडूस, पळवे, जातेगाव, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण आदी ठिकाणी किल्ले शिवनेरी वरून आणलेल्या पायी ज्योतीचे स्वागत करून शिवजयंती साजरी करण्यात आली.

सुपा येथील महालक्ष्मी युवा प्रतिष्ठानच्या शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे, उद्योजक योगेश रोकडे, पारनेर तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्ता नाना पवार, महालक्ष्मी युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष कानिफनाथ पोपळघट, पांडुरंग मगर, कृष्णा कोल्हे, सागर काळे, निलेश पवार, ताराचंद शिंदे, नवनीत पवार, सागर सुर्यवंशी आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. सायंकाळी सुपा चौकातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.

कडूस येथील सरपंच मनोज मुंगसे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवनेरी किल्ल्यावरून पायी ज्योत आणण्यात आली. भोयरे गांगर्डा येथे शिवनेरी किल्ल्यावरून आणलेल्या पायी ज्योतीचे ग्रामस्थांनी स्वागत केले.

ब्लुमिंग बड्स इंग्लिश स्कूल जुनियर कॉलेज नारायणगव्हाण च्या माध्यमातून शिवजयंती उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष धनंजय नाईक यांनी केले. सुपा येथील एमइटी इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष अनिकेत पठारे, प्राचार्या मोनाली पठारे आदी उपस्थित होते.




## छावा चित्रपटाबद्दल स्वरा भास्करची सडकून टीका

मुंबई : लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित छावा या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. विकी कौशल आणि रश्मिका मंदानाची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. एकीकडे या चित्रपटावर प्रेक्षक आणि सेलिब्रिटींकडून कौतुकाचा वर्षाव होत असताना दुसरीकडे अभिनेत्री स्वरा भास्करने त्यावरुन टीका केली आहे. छावा'ला मिळणाऱ्या भरभरून प्रतिक्रियांची तुलना तिने काही काळापूर्वी महाकुंभमध्ये घडलेल्या दुर्घटनेशी केली आहे. स्वरा तिच्या बेधडक मतांसाठी ओळखली जाते. सोशल मीडियावर ती तिची मतं बिनधास्तपणे मांडत असते. मात्र त्यामुळे अनेकदा तिला ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. आता छावा'बद्दलच्या स्वराच्या या पोस्टवर नेटकऱ्यांनीही विविध प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका सुशोभित आणि काल्पनिक चित्रपटात ५०० वर्षांपूर्वी हिंदूंवर होणारा अत्याचार पाहून लोक संतापलेले दिसत आहेत. परंतु महाकुंभमध्ये चेंगराचेंगरी आणि गैरव्यवस्थापनावर होणारे भयानक मृत्यू आणि जेसीबी बुलडोझरने मृतदेह उचलण्याबद्दल ते गप्प आहेत. हा समाज मेंदू आणि आत्म्याने मृत झालेला समाज आहे', अशी टीका तिने केली आहे. स्वराने या ट्विटमध्ये थेट छावा'चा उल्लेख केला नसला तरी तिच्या ट्विटमधील चित्रपटाचा संदर्भ हा छावा'चाच असल्याचं स्पष्ट होतंय. त्यावरून नेटकऱ्यांनीही प्रतिक्रिया दिल्या आहेत. जर एखादा हिंदू व्यक्ती त्याच्या धर्माशी संबंधित गोष्टींबद्दल भावनिक होत असेल तर त्यात समस्या काय आहे,' असा सवाल एकाने केला. तर खऱ्या इतिहासात इतक्या भयानक गोष्टी घडल्या आहेत की ते दाखवण्यासाठी बऱ्याच गोष्टी लपवाव्या लागल्या', असं दुसऱ्याने म्हटलंय. छावा' या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा दाखवणयात आली आहे. यामध्ये अभिनेता विकी कौशलने छत्रपती संभाजी महाराजांची भूमिका साकारली आहे. तर रश्मिका मंदाना ही महाराणी येसुबाई आणि अक्षय खन्ना हा औरंगजेबाच्या भूमिकेत आहे. या चित्रपटाने अवघ्या पाच दिवसांत २०० कोटी रुपयांहून अधिक कमाई केली आहे. या चित्रपटाला पहिल्या दिवसापासून प्रेक्षकांकडून दमदार प्रतिसाद मिळतोय. सोशल मीडियावरही छावा'चीच चर्चा पहायला मिळतेय.

# नागपूर एमआयडीसीमधील उद्योजक दहशतीखाली

## अवैध धंद्यांवर कारवाई करण्याची आमदार संग्राम जगताप यांची उद्योजकांसह पोलीस अधीक्षकांकडे मागणी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री




एमआयडीसीत क्लासिक हॉटेल ते गांधीनगरपर्यंतच्या रस्त्यावर राजरोजपणे अवैद्य धंदे सुरू असून अल्पवयीन मुलांना व्यसनाला करून त्यांच्याकडून गुन्हे करवून घेण्याचे काम होत आहे. उद्योजक हा आपल्या देशाचा आर्थिक कणा असून त्यांना व्यवसायासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करून देणे ही आपली जबाबदारी आहे पोलीस प्रशासनाने कडक कारवाईची मोहीम हाती घेऊन गुन्हेगारांवर वचक निर्माण करावा अशी मागणी आमदार संग्राम जगताप यांनी उद्योजकांसह जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन केली आहे.

नागापूर एमआयडीसीमध्ये राजरोसपणे अवैध धंदे सुरू असून गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक व अल्पवयीन मुले वेगवेगळ्या प्रकारचे व्यसन करून खंडणी, चोरी, मारहाण करत दहशत निर्माण करतात. त्यामुळे उद्योजकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे असेच चालू राहिले तर उद्योग धंदे बंद पडतील. चौकाचौकांत अवैद्य धंदे वाढलेत. गांजा, मटका, गावठी दारू विक्री मोठ्या प्रमाणात चालत आहे. यामुळे उद्योजक व महिला कामगारांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर पोलीस प्रशासनाने तातडीने कारवाई करून गुन्हेगारांच्या मुसक्या आवळाव्यात, तसेच सन फार्मा व सह्याद्री चौकात कायम वाहतूक कोंडी होत असल्यामुळे तिथे वाहतूक पोलिसाची नेमणूक करावी, रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी, याचबरोबर एल ब्लॉक मध्ये पोलीस चौकी उभी करण्याची मागणी उद्योजकांनी जिल्हा पोलीस अधिक्षक राकेश ओला यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्यासह आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, उपाध्यक्ष महेश इंदानी, राजेंद्र कटारिया, सचिव सागर निंबाळकर, चिन्मय सुकट, सुमित लोढा, पुरुषोत्तम बुरा, दौलत शिंदे, दिलीप अकोलकर, गोकुळ हांडे, रोहन गांधी, सचिन पाठक, दीपक नागरगोजे, आदीसह उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### उद्योजकांना मारहाण, दमबाजी

एमआयडीसी परिसरात अवैध धंद्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असल्यामुळे गुन्हेगारी देखील वाढली आहे. कामगारांमध्ये भांडणे होत असून थेट उद्योजकांनाच मारहाण, दमबाजी केली जाते. पगाराच्या दिवशी पाळत ठेवून चोऱ्या केल्या जातात. यावर पोलिसांनी कडक कारवाई करावी अशी मागणी एमआयडीसीतील उद्योजकांनी केली आहे.

# छत्रपतींच्या विचारानेच सरकार काम करेल : अक्षय कर्डिले

## नगर तालुका कृषिउत्पन्न बाजार समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराचे सरकार राज्यामध्ये आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेण्याचे काम केले होते त्याच धर्तीवर हे सरकार देखील काम करेल, असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष अक्षय कर्डिले यांनी केले.

नगर तालुका कृषिउत्पन्न बाजार समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी अक्षय कर्डिले बोलत होते. यावेळी उपसभापती रभाजी सूळ, संचालक संतोष म्हस्के, सुधीर भापकर, भाऊ भोर, सुभाष निमसे, दत्ता तापकिरे, भाऊसाहेब ठोंबे, रामदास सोनवणे, सचिव अभय भिसे, संजय काळे, रणसिंग भोर आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नगर तालुका कृषिउत्पन्न बाजार समितीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य कार्यातून प्रेरणा घेऊन शेतकरी हिताचे धोरण राबवत शेतकऱ्यांच्या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी विविध उपयोजना केल्या जात आहे, असेही अक्षय कर्डिले म्हणाले.

### शेतकरीहिताचे निर्णय : सूळ

नगर तालुका कृषिउत्पन्न बाजार समितीच्या वतीने मार्केटयार्ड आवारामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याच्या परिसराच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले असल्यामुळे परिसराला सौंदर्य प्राप्त झाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचाराने बाजार समितीचा कारभार चालत असून शेतकरी हिताचे निर्णय घेतले जात आहेत, असे मत उपसभापती रभाजी सूळ यांनी व्यक्त केले.

# छावा टॅक्स फ्री करा

## प्रा. माणिक विधाते यांचे उपमुख्यमंत्र्यांना निवेदन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यगाथेचा इतिहास सांगणाऱ्या छावा हा चित्रपट राज्य सरकारकडून टॅक्स फ्री करण्याची मागणी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते आणि श्री विशाल गणपती मंदिर देवस्थानचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांनी केली आहे. या चित्रपटाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत असताना, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन पाठवून सदर चित्रपट टॅक्स फ्री करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

हा चित्रपट युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित असून, महाराष्ट्रातील शिवभक्तांमधून त्याला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले व या भूमीत जन्मलेल्या या दोन्ही महाराजांनी अखंड हिंदुस्तानचा इतिहास रचला आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून लोकांना छत्रपती संभाजी महाराज यांचे जीवन आणि त्यांचे संघर्ष अनुभवता येणार आहेत. हा चित्रपट टॅक्स फ्री होणे आवश्यक आहे. यापूर्वी देखील महाराष्ट्रात अनेकदा ऐतिहासिक, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वावर आणि महापुरुषांच्या जीवन संघर्षावरील आधारित चित्रपट टॅक्स फ्री करण्यात आलेले असून, महाराष्ट्रातील सर्व शिवभक्तांची ही भावना असल्याचे निवेदनात म्हंटले आहे.

अहिल्यानगर शहर मतदारसंघाचे आमदार संग्राम जगताप यांनी स्वखर्चाने महिलांसाठी छावा चित्रपट सिनेमागृहात मोफत उपलब्ध करून दिला आहे. लाडक्या बहिणींना हा चित्रपट मोफत दाखविला जात आहे. राज्य सरकारने देखील चित्रपटाच्या प्रसारासाठी योगदान देण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# पारंपरिक वाद्यांच्या माध्यमातून मिरवणुका काढणे गरजेचे : चोपडा




अहिल्यानगर । नगर सह्याद्री

छत्रपती शिवाजी महाराज हे एक आदर्श व्यक्तिमत्व असून त्यांचे विचार प्रत्येकाने अंगीकारले पाहिजे, त्यांचा इतिहास समाजासमोर आण्यासाठी पारंपारिक पद्धतीने शिवजयंती साजरी करणे गरजेचे आहे. सध्या मिरवणुका म्हटले की डीजे वाजवीला जातो याला आता युवकांनी फाटा देत आपले पारंपरिक वाद्यच्या माध्यमातून ढोल-ताशाच्या गजरामध्ये मिरवणुका काढणे गरजेचे आहे. हे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत आहे आदर्श व्यापरी मित्र मंडळ वर्षभर गणेश उत्सव, महावीर जयंती तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करत आपली संस्कृती व संस्कार जोपासण्याचे काम करतात. कापड बाजार भिंगारवाला चौक येथे डीजे मुक्त छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली सामाजिक उपक्रम साजरी करत असताना आमदार संग्राम जगताप व माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे यांचे नेहमीच सहकार्य लाभत असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक संजय चोपडा यांनी केले.

कापड बाजार आदर्श व्यापारी मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना श्री. बडी साजन संघाचे माजी उपाध्यक्ष ज्येष्ठ संचालक धरमचंद कोठारी व शैलेश गांधी समवेत अध्यक्ष राजेंद्र ताथेड, माजी नगरसेवक संजय चोपडा, राजेंद्र गांधी, नफिस चुडीवाला, अजय गुगळे, डॉ.सचिन बोरा, मनीष चोपडा, राजेश दायमा, सौरीत बोरा, प्रफुल्ल मुथा, प्रवीण शिंगवे, हेमंत डोशी, प्रीतम पोखरणा, रुपेश कटारिया, किशोर शहा आदी उपस्थित होते.

### गुजरात येथे होणाऱ्या ओपन आशिया पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिपसाठी

# नंदकिशोर रामदिन, देवदत्त गुंडू व यश नवले यांची निवड



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

पुणे येथे नॅशनल रॉ चॅम्पियनशिप महाराष्ट्रातील खेळाडूंनी उत्तम खेळ केला. महाराष्ट्रातील ३८ खेळाडूंची निवड ओपन आशिया पॉवर लिफ्टींग चॅम्पियनशिपसाठी करण्यात आली. ही स्पर्धा सुरत येथे २१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. यात अहिल्यानगरचे नंदकिशोर रामदिन, देवदत्त प्रवीण गुंडू व यश नवले यांची निवड करण्यात आली.

या स्पर्धेत आशियातील ४० हून अधिक देशांतील खेळाडू भाग घेणार आहेत. या निवडीबद्दल युनायटेड पॉवर लिफ्टिंग असोसिएशनच्या राज्याचे अध्यक्ष सचिन टापरे, उपाध्यक्ष मनोज गायकवाड, अदनान बदाम, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त मधुकर गायकवाड, सोहेल शेख, सद्दम सय्यद, अयनुल सय्यद, राजू थोरात यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# समर्थ विद्यामंदिर प्रशालेत शिवजयंती साजरी

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



कार्यक्रमाची सर्व धुरा आयोजन, नियोजन, प्राथमिक विभागाचे सर्व विद्यार्थी, बाल मावळ्यांनी सांभाळली. निमित्त होते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे...

इयत्ता चौथीच्या आस्था भंडारी हिने आपल्या खड्या आवाजात आपले मनोगत व्यक्त केले. चि.ओम देशमुख यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा सादर केला. या सर्व कार्यक्रमाची धुरा सांभाळणारे आमचे बाल मावळे यात फलक लेखन करणारे चि. आयुष वाळुंज, दुर्वांक तीळवले, आदेश पुजारी तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. काव्या भालेराव हिने केले व आभार ऋषभ नागरगोजे याने मानले.

मान्यवरांच्या सत्काराचे सूत्र वरद दळवी यांनी सांभाळले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित इयत्ता चौथीतील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला सादरीकरणातून सर्व उपस्थित शिवभक्त भावुक झाले. या सांस्कृतिक कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक गणेश पारधे यांनी मार्गदर्शन केले.

सावेडीतील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला संस्थेचे सचिव तथा प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर तसेच संस्थेचे व्हा. चेअरमन श्रीपाद कुलकर्णी तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या संगीता जोशी, माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक सुनील कानडे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्रीपाद कुलकर्णी यांनी कोणतेही काम करताना आत्मविश्वास आणि त्या कार्याचे नियोजन कसे असावे हे सांगताना छत्रपती शिवाजी महाराजांची नियोजन कसे होते हे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

सुरेश क्षीरसागर यांनी आदर्श राजा कसा असावा हे आपल्या भाषणातून व्यक्त केले. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार फक्त मनात न ठेवता आचरणात आणावे असे सांगितले.

# जिल्हा मराठा पतसंस्थेकडून विकासात्मक काम

## बाळासाहेब काळे । मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अभिवादन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री




शिस्तबद्ध लष्कर व सुघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भूगोल, आश्चर्यजनक वेगवान हालचाली आणि बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खच्ची करणारे नेमके हल्ले यांचा वापर करणारे गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. जिल्हा मराठा पतसंस्था गेले २४ वर्ष सामाजिक भावना डोळ्यासमोर ठेवून विकासात्मक काम करीत आहे, असे जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेचे व्हा. चेअरमन बाळासाहेब काळे यांनी केले.

मराठा सेवा संघ प्रणित जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने शिवजयंतीच्या निमित्ताने मार्केट यार्ड येथील शाखेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे, संचालक लक्ष्मणराव सोनाळे, उदय अनभुले, द्वारकाधीश राजे भोसले, बाळासाहेब सोनाळे, संचालिका राजश्रीताई शितोळे, डॉ. कल्पनाताई ठुबे, मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ सदस्य सोपानराव मुळे, डॉ. संदीप भुकन, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष नंदिनीताई सोनाळे व स्वाती जाधव, योगिता कर्डिले, अंबिका महिला बँकेच्या सेवानिवृत्त अधिकारी करुणाताई काळे, पद्मा गांगर्डे, प्रतिभा सोनाळे, स्वाती बनकर, प्रतिभा भुकन, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, व्यवस्थापक बबन सुपेकर, गोरख काटे, शाखाधिकारी प्रितेश बोरुडे, पुष्पा इंगळे, रणजीत रकटाटे, कविता ढोणे, प्रशांत बोरुडे, तेजस कासार, सुप्रिया मोरे यांसह सभासद बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बाळासाहेब काळे म्हणाले, पतसंस्थेच्या मागे समाजाने खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त सभासदांसाठी विविध योजना सुरु करण्यात आले आहे. आकर्षक ठेवींवर आकर्षक व्याज देण्यात येणार आहे.

यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष इंजि.सुरेश इथापे म्हणाले, जगाच्या पाठीवर असा राजा होऊन गेला. त्यांचा राजनिती, युद्धनिती, गनिमीकावा, प्रशासक हे संपूर्ण जगामध्ये अभ्यासलं जात, असा राजा होणे नाही. छत्रपतींचा सर्वांनी आदर्श घ्यावा तसेच छत्रपती शिवाजीराजेंचे एकजरी गुण अंगीकारला तर आपले जीवन धन्य झाल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले.

प्रारंभी स्वागत करताना संचालक उदय अनभुले म्हणाले, गेली २४ वर्ष मराठा पतसंस्था ही आर्थिक चळवळी बरोबर सामाजिक चळवळीतही अग्रेसर आहे. दरवर्षी महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत असते. त्यास समाजही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देतो. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालक लक्ष्मण सोनाळे यांनी केले तर आभार अशोक वारकड यांनी मानले.

# विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचे चरित्र अभ्यासावे

## दत्ता जाधव । डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात साहित्याचे वाटप

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



छत्रपती शिवाजी महाराज यांनी अठरा पगड जातींना एकत्र करून स्वराज्य निर्माण केले. त्यांचे कार्य सर्वांसाठी नेहमीच प्रेरणादायी राहील. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना, मावळ्यांना प्रेरणा देत सांघिक भावना निर्माण केली. स्वतः आघाडीवर राहून ते प्रेरणा देत. अशा थोर महापुरुषांचे विचार, आचार हे समाजासाठी नेहमीच प्रेरणादायी राहतील. विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र अभ्यासले पाहिजे, जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर ते मार्गदर्शकच राहील, असे प्रतिपादन शिवसेना विधानसभा प्रमुख दत्ता जाधव यांनी केले.

रेल्वे स्टेशन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात शिवजयंती निमित्ताने शिवसेना विधानसभाप्रमुख दत्ता जाधव यांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रशांत गायकवाड, दीपक खैरे, महेश रपारिया, सुधीर जायभाय, आदेश जाधव, नीलेश जाधव, प्रसाद साळवे, दीपक लोंढे, मुख्याध्यापक विजय घिगे, मेघना गावडे, मनीषा गिरमकर, खान शबनम आरा शकील आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

प्रशांत गायकवाड म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज क्रांतीचे प्रतीक होते. छत्रपती शिवरायांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतचा प्रत्येक दिवस हा देशासाठी प्रेरणादायी आहे. दीपक खैरे म्हणाले की, आपण शिवराय सांगतो, ऐकतो, जयघोष करतो ते सर्व सोपे आहे पण शिवराय अंगीकरणे अवघड आहे;

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन मेघना गावडे यांनी केले. मुख्याध्यापक विजय घिगे यांनी आभार मानले.